# वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा नमुना

## पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड

### पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार **पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली (२६२) पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४** या कालावधीत स्विकारण्यात येतील. ह्या बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरिक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परिक्षा ही **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा ही एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारीरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यात येईल.**

- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावून आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या-त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. **त्यामुळे जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.**
- **जाहिराती मध्ये नमूद केलेल्या सर्व प्रवर्गातील रिक्त पदांच्या संख्येमध्ये कोणत्याही कारणास्तव पोलीस भरतीच्या अंतिम टप्प्यापर्यंत बदल झाल्यास त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानूसार भरती समिती अध्यक्ष/नियुक्ती प्राधिकारी यांना पदे भरण्याच्या अधिकार आहे.**

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
अतिरिक्त कार्यभार- अपर पोलीस आयुक्त
तथा अध्यक्ष, पोलीस भरती समिती
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड.

# संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३**

**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**

**जाहिरात क्रमांक.१** **ठिकाण - पिंपरी चिंचवड**

**दिनांक.०१.०३.२०२४**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक.२३.०६.२०२२ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी (२६२) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदांची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा-अ | भ.ज-ब | भ.ज-क | भ.ज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | **54** | **20** | **10** | **7** | **12** | **0** | **13** | **99** | **24** | **23** | **0** | **262** |
| **कप्पीकृत आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | 16 | 6 | 3 | 2 | 4 | 0 | 4 | 30 | 7 | 7 | 0 | 79 |
| **महिला** | 16 | 6 | 3 | 2 | 4 | 0 | 4 | 29 | 7 | 7 | 0 | 78 |
| **खेळाडु** | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 5 | 1 | 1 | 0 | 15 |
| **प्रकल्पग्रस्त** | 3 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 5 | 1 | 1 | 0 | 14 |
| **भुकंपग्रस्त** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 4 |
| **माजी सैनिक** | 8 | 3 | 2 | 1 | 2 | 0 | 2 | 15 | 4 | 4 | 0 | 41 |
| **अंशकालीन पदवीधर** | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 1 | 1 | 0 | 11 |
| **पोलीस पाल्य** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 0 | 7 |
| **गृहरक्षक दल** | 3 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 5 | 1 | 1 | 0 | 13 |
| **अनाथ** | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२का-०३,दि.०६.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार एकुण रिक्त पदांच्या १% इतकी पदे. **म्हणजे ३ पदे** | | | | | | | | | | | |

**महत्वाची टीप :**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांना दुरध्वनी क्रमांक-७८७५३३३३३३ व ०२०-२६१३२८०२ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०२२-२०२३ तथा पोलीस आयुक्त यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचण आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड कंट्रोल | ०२०-२७३५२५०० |

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
अतिरिक्त कार्यभार- अपर पोलीस आयुक्त
तथा अध्यक्ष, पोलीस भरती समिती
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड